आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
१९ मार्च २०२५ - बुधवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- अंतराळवीर सुनीता विल्यम्स आणि बुच विल्मोर यांचं पुनरागमन, साऱ्या जगासह भारतानंही केलं स्वागत

- ऑनलाइन जुगार आणि सट्टाबाजारावर नियंत्रण आणण्यात सरकारला बऱ्याच प्रमाणात यश आलं असून २०२४ मधे अशा एक हजारापेक्षा जास्त संकेतस्थळांवर बंदी आणल्याचं सरकारचं लोकसभेत निवेदन

- नागपूर हिंसाचाराप्रकरणी अटक केलेल्या ५१ जणांना येत्या २१ तारखेपर्यंत पोलीस कोठडी

- स्विस खुल्या बॅडमिंटन स्पर्धेच्या महिला दुहेरी गटात भारताच्या ट्रिसा जॉली आणि गायत्री गोपीचंद या जोडीचा दुसऱ्या फेरीत प्रवेश

**आणि**

- पुण्याच्या हिंजवडी भागात टेम्पो ट्रॅव्हलरला लागलेल्या आगीत चार जणांचा होरपळून मृत्यू

**<><><><><>**

गेले नऊ महिने अंतराळ स्थानकात अडकून पडलेल्या भारतीय वंशाच्या नासाच्या अंतराळवीर सुनीता विल्यम्स आणि त्यांचे सहकारी बुच विल्मोर आज पहाटे स्पेसएक्स क्रू ड्रॅगन स्पेसक्राफ्टमधून पृथ्वीवर परतले. त्यांचं स्पेसएक्स कॅप्सूल हे पॅराशूटच्या मदतीने मेक्सिकोच्या आखातात फ्लोरिडा पॅनहँडलमधील टालाहासीच्या किनाऱ्याजवळ उतरलं. यासोबतच आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानक, मधील नासाचे निक हेग आणि रशियन अंतराळवीर अलेक्झांडर गोर्बुनोव्ह हे

अंतराळवीरही परतले आहेत. गेल्या जूनमध्ये केवळ ८ दिवसांच्या मोहिमेसाठी गेलेले नासाच्या दोन्ही अंतराळवीरांनी अंतराळात २८६ दिवस अंतराळात घालवले. आता पृथ्वीच्या गुरुत्वाकर्षणाशी आणि इतर गोष्टींशी जुळवून घेण्यासाठी त्यांच्यासाठी ४५ दिवसांचा पुनर्वसन कार्यक्रम आखला आहे. स्पेसेक्सच्या संपूर्ण गटाचं नासानं अभिनंदन केलं आहे.

नासाच्या क्रू नाईन मोहिमेच्या यशाबद्दल राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी नासाच्या संपूर्ण पथकाचं अभिनंदन केलं आहे. भारताची कन्या सुनीता विल्यम्स आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी आपली चिकाटी, समर्पण आणि वीजिगीषु वृत्तीने सर्वांना प्रेरणा दिली आहे, असं राष्ट्रपती आपल्या समाज माध्यमावरच्या संदेशात म्हणाल्या आहेत. अंतराळवीरांचा ऐतिहासिक प्रवास हा दृढनिश्चय, एकोपा आणि असामान्य धैर्याची कहाणी आहे. त्यांना उत्तम आरोग्यासाठी शुभेच्छा असं राष्ट्रपती आपल्या संदेशात म्हणाल्या आहेत.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनीही या अंतराळवीरांचं स्वागत केलं असून पृथ्वीवर सुरक्षित परतल्यावर भारताला भेट देण्याचं आमंत्रण सुनीता विल्यम्स यांना दिलं आहे.

संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी भारतीय वंशाच्या अंतराळवीर सुनिता विल्यम्स आणि त्यांचे सहकारी पृथ्वीवर परत आल्याबद्दल अभिनंदन केलं आहे. सामाजिक माध्यमावरच्या संदेशात सिंह यांनी, या अंतराळवीरांच्या समर्पणाचं कौतुक करत, हा अवकाश संशोधनासाठी अभिमानाचा क्षण असल्याचं म्हटलं आहे.

**<><><><><>**

ऑनलाइन जुगार आणि सट्टाबाजारावर नियंत्रण आणण्यात सरकारला बऱ्याच प्रमाणात यश आलं असून २०२४ या वर्षात अशा एक हजारापेक्षा जास्त संकेतस्थळांवर बंदी आणली आहे, अशी माहिती इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांनी आज लोकसभेत दिली. अशा प्रकारच्या

कोणत्याही संकेतस्थळाची माहिती मिळताच केंद्र सरकार कायद्याच्या चौकटीत राहून त्यावर तत्काळ कारवाई करत असल्याचंही त्यांनी पुरवणी प्रश्नाला उत्तर देताना सांगितलं.

गगनयान मोहिमेसाठी निवडलेले चार अंतराळवीरांचं प्रशिक्षण सध्या सुरू आहे आणि यातून त्यांचं लक्ष विचलित होऊ नये, म्हणून त्यांना प्रकाशझोतापासून दूर ठेवलं आहे, अशी माहिती विज्ञान आणि तंत्रज्ञान आणि भूविज्ञान राज्यमंत्री जितेंद्र सिंह यांनी आज लोकसभेत प्रश्नोत्तराच्या तासाला दिली. भारताच्या या पहिल्यावहिल्या मानवी अंतराळ मोहिमेसाठी ग्रुप कॅप्टन प्रशांत नायर, अंगद प्रताप, अजित कृष्णन आणि सुधांशू शुक्ला या चौघांची निवड झाली आहे.

**<><><><><>**

राज्यातल्या सर्व वैद्यकीय शिक्षण विभागाच्या रुग्णालयांमध्ये औषधांचा तुटवडा नेमका किती आहे याची माहिती घेण्यासाठी तीन आमदारांची समिती नेमण्याचे निर्देश अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी आज विधानसभेत दिले. पुढच्या पंधरा दिवसांत त्याचा अहवाल सादर करण्यात यावा असंही त्यांनी सांगितलं.

अंबरनाथ, बदलापूर येथील बारवी धरणासाठी संपादित करायच्या वाढीव ६१ हेक्टर जमिनीची संपादन प्रक्रिया लवकर सुरू करून ती पूर्ण करण्यात येईल अशी माहिती उद्योग मंत्री उदय सामंत यांनी दिली. याबाबतचा प्रश्न किसन कथोरे यांनी उपस्थित केला होता.

शिवाजी विद्यापीठाचं उप केंद्र सांगली जिल्ह्यात खानापूर इथे सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, त्यासाठी नवीन अभ्यासक्रम आणि सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यात येतील अशी माहिती उच्च आणि तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिली.

**<><><><><>**

राज्यातल्या महामार्गांवर दर २५ किलोमीटर अंतरावर शौचालयं उभी करण्याचा निर्णय महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागानं घेतला आहे. या स्वच्छतागृहांची देखभाल, सुरक्षा आणि स्वच्छता राखण्याची जबाबदारी सेवाभावी संस्था किंवा बचत गटांना दिली जाईल, असं सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्र राजे भोसले यांनी आज विधानपरिषदेत सांगितलं. महिला स्वच्छतागृहांची कमतरता असल्याचं सांगत भाजपाच्या चित्र वाघ यांनी ही चर्चा उपस्थित केली होती.

रायगड जिल्ह्यात पाचाड इथं राजमाता जिजाऊ समाधीस्थळाच्या विकासासाठी आवश्यक ती सगळी कामं तातडीनं करण्यात येतील, असं सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांनी सांगितलं. रायगड किल्ला आणि जिजाऊ समाधीस्थळ पुनर्विकासाचा एकत्रित आराखडा तयार असून त्यात सिंदखेडराजा इथल्या जिजाऊंच्या जन्मस्थळाचाही समावेश केला जाईल, असं शेलार म्हणाले.

नागपूर इथं हिंसाचारात दगडफेक झाली त्याबाबत काँग्रेस आमदार असल्म शेख यांनी विधानभवन परिसरात प्रसारमाध्यमांना सांगितलं….

**होल्ड बाईट… असल्म शेख**

**<><><><><>**

नागपूर हिंसाचारात सहभागी असल्याच्या आरोपावरून अटक केलेल्या ५१ जणांना पोलिसांनी जिल्हा सत्र न्यायालयात हजार केलं असता न्यायालयानं सर्व आरोपींना येत्या २१ तारखेपर्यंत पोलीस कोठडीत ठेवण्याचे निर्देश दिले.

हिंसाचारात गंभीर जखमी झालेल्या सर्व पोलीस अधिकाऱ्यांना रुग्णालयातून सुट्टी देण्यात आली आहे. यात ३ पोलीस उपयुक्त, आणि ६ वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांचा समावेश आहे, असं पोलीस उपायुक्त निकेतन कदम यांनी सांगितलं.

नागपूर शहरात ११ पोलीस ठाण्यांच्या अंतर्गत आजही कलम १६३ अंतर्गत संचारबंदी लागू आहे, शहरातल्या १०० पेक्षा जास्त शाळा, महाविद्यालयं बंद ठेवण्यात आली आहेत.

<><><><><>

नागपूर हिंसाचाराच्या पार्श्वभूमीवर छत्रपती संभाजी नगरचे जिल्हा दंडाधिकारी दिलीप स्वामी यांनी आज खुल्ताबाद इथं औरंगजेबाच्या कबरीच्या आसपासच्या परिसरात परिस्थितीची पाहणी केली, तसंच आढावा बैठक घेतली. पोलीस अधीक्षक विनयकुमार राठोड हेही बैठकीला उपस्थित होते. अलीकडेच उद्भवलेल्या वादाच्या पार्श्वभूमीवर तिथं सुरक्षा बंदोबस्त वाढवण्यात आला असून निगराणी कडक करण्यात आली आहे. नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये, असं आवाहन स्वामी यांनी यावेळी केलं.

<><><><><>

स्वित्झर्लंडमध्ये सुरू असलेल्या खुल्या बॅडमिंटन स्पर्धेच्या महिला दुहेरी गटात भारताच्या ट्रिसा जॉली आणि गायत्री गोपीचंद यांनी दुसऱ्या फेरीत प्रवेश केला आहे. पहिल्या फेरीत त्यांनी स्वित्झर्लंडच्या ॲलाईन मुलर आणि नेदरलँड्सच्या केली व्हॅन बुइटेन या जोडीचा २१-१६, २१-१७ असा पराभव केला. उद्या होणाऱ्या उपउपांत्यपूर्व फेरीत ट्रिसा आणि गायत्रीचा सामना सेलिन हब्श आणि अमेली लेहमन या जर्मन जोडीशी होईल. महिला एकेरी प्रकारात आज संध्याकाळी भारताची पी. व्ही. सिंधू हिची लढत डेन्मार्कच्या ज्युली डावल जेकोबसेन हिच्याशी होईल, तर मालविका बनसोड हिचा सामना कॅनडाच्या मिशेल लीबरोबर होणार आहे.

<><><><><>

पुण्याच्या हिंजवडी भागात टेम्पो ट्रॅव्हलरला लागलेल्या आगीत चार जणांचा होरपळून मृत्यू झाला, तर पाचजण जखमी झाले. आज सकाळी आठच्या सुमाराला

चालकाच्या पायाखाली आग लागली. चालकाने गाडीचा वेग कमी केल्यावर त्याच्यासह पुढे बसलेले कर्मचारी गाडीतून खाली उतरले. मात्र, दुसऱ्या बाजूचं दार न उघडल्याने इतरांना बाहेर पडता आलं नसल्यानं त्यातल्या काहींचा होरपळून मृत्यू झाला. या घटनेतल्या जखमींवर रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

**<><><><><>**

पश्चिमी वाऱ्यांच्या प्रभावामुळे देशाच्या काही राज्यात तापमान घसरलं आहे. हिमाचल प्रदेशात बहुतेक ठिकाणी आकाश अभ्राच्छादित आहे. पाऊस आणि हिमवृष्टीमुळे लाहौल स्पीति आणि चंबा जिल्ह्यात मिळून १०० हून जास्त रस्ते अद्याप बंद आहेत. डोंगराळ भागात हिमवृष्टीची शक्यता असून काही ठिकाणी हिमस्खलनाचा धोका संभवतो. दोन जिल्ह्यात ऑरेंज तर दोन जिल्ह्यात यलो अलर्ट हवामान विभागाने जारी केला आहे.

याच प्रभावामुळे मध्यप्रदेशातही पावसाची शक्यता आहे. सोसाट्याचे वारे आणि विजेच्या कडकडाटासह अनेक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता आहे.

राजस्थानात १२ जिल्ह्यांमधे पाऊस आणि गारपिटीची शक्यता वेधशाळेनं वर्तवली आहे. मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात या काळात तुरळक ठिकाणी जोरदार पावसाची शक्यता आहे.

**//<><><><><>//**